**महाराष्ट्र शासन**
**सह संचालक (उच्च शिक्षण)**
१७ डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे-४११००१
Website: www.jdhepune.info E-mail: jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्रमांक ०२०- २६०५१६३२

क्रमांक: संकीर्ण-२०२३/(/२३)/पुणे विभाग/३६९३ दिनांक : ११-१२-२०२३

प्रति,

१) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२) कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, पुणे.
३) प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालये, पुणे विभाग.

विषय :- "शांतता, पुणेकर वाचत आहेत" या उपक्रमात सहभागी होणे बाबत.......
संदर्भ:- संयोजक, पुणे ग्रंथ महोत्सव यांचे दि.०५-१२-२०२३ रोजीचे पत्र.

सस्नेह नमस्कार!

आपणास सानंद कळविण्यात येते की, भारत सरकारच्या राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आपल्या पुण्यात दिनांक १६ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२३ च्या दरम्यान "ग्रंथ महोत्सव" आयोजित केलेला आहे. आपल्या शहरातून आणि राज्यभरातून लाखो विद्यार्थी हा वाचनानंद घेतील. यामध्ये पुस्तक प्रदर्शनाबरोबर विविध सांस्कृतिक कार्यकम, चर्चासत्रे, साहितिकांच्या मुलाखती, सृजनशिलतेला वाव देणारे आणि वाचन संस्कृतीचा विकास घडविणारे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

या उपक्रमाची पूर्वतयारी म्हणून आपण एक अनोखे आयोजन करतोय! "शांतता, पुणेकर वाचत आहेत!" या उपक्रमासाठी आपल्या विद्यापीठातील / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दि.१४ डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी १२:०० ते १:०० या वेळेत आपल्या आवडीचे पुस्तक घेऊन आहे त्या ठिकाणी वाचनासाठी प्रवृत्त करावे आणि **समुहाचा फोटो,** विद्यार्थी कुठले पुस्तक वाचतोय त्याचा फोटो सोबत दिलेल्या गुगल फॉर्म मध्ये भरावा. सदरहू **गुगल फॉर्म ची लिंक** https://pbf२३.in/register अशी आहे.

**वाचन सहकार्याच्या प्रतीक्षेत ..!**

(डॉ.केशव तुपे)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग,पुणे-१.

प्रत:-

१) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) संयोजक, पुणे ग्रंथ महोत्सव.

प्रति,
मा . केशव तुपे
सहसंचालक ,
पुणे विभाग , पुणे

दिनांक : ०५/१२/२०२३

**विषय : "शांतता, पुणेकर वाचत आहेत." या उपक्रमात सहभागी होणेबाबत.**

दिनांक १६ ते २४ डिसेंबर, २०२३ या कालावधी, राष्ट्रीय पुस्तक न्यास या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत संस्थेच्या वतीने, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या पटांगणावर भव्य पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाला ५ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि नागरिक भेट देतील, अशी अपेक्षा आहे. त्यामध्ये 200हून अधिक पुस्तक-विक्रीकेंद्रे, विविध प्रदर्शने, खाद्य जत्रा, सेल्फी पॉइंट इत्यादींचा समावेश आहे.

याच उपक्रमाचा पहिला टप्पा म्हणून दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी १२.०० ते १.०० या वेळेत "शांतता, पुणेकर वाचत आहेत." या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांना सदर उपक्रमात सहभागी होण्याबाबत आवाहन करावे. जेणेकरून पुणे शहराच्या वाचन परंपरेला पुढे घेऊन जाण्यासाठी आपले योगदान महत्वपूर्ण राहील. तरी आपल्याशी संबंधित सर्व घटकांना सहभागी होण्याबाबत आवाहन करावे. ही विनंती.

संपर्क : प्राचार्य डॉ. संजय चाकणे (मो. नं. ७०२०६७४५४५/ ९८९०१७१८५७)

कळावे,

आपला

राजेश पांडे
(संयोजक, पुणे ग्रंथ महोत्सव)